Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred) ISSN – 2454 - 7905

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार

डॉ.भारती जगन्नाथ यादव
महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी, पुणे -१७

**गोषवारा:**

प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे एक असामान्य, प्रतिभावंत असे व्यक्तिमत्व होय. कायदा, समाजशास्त्र, राज्यशास्त्र आणि मानववंशशास्त्र अशा अनेक शास्त्रांमध्ये तसेच समाजकारण, धर्मकारण, राजकारण आणि पत्रकारिता अशा विविध क्षेत्रांमध्ये त्यांनी बहुमोल कामगिरी बजावलेली असली तरी ते मूलतः अर्थतज्ञ होते. कोलंबिया विद्यापीठाने १९१५ मध्ये एम.ए. आणि १९१७ मध्ये पी.एच.डी. या पदव्या प्रदान केल्या त्या अर्थशास्त्र या विषयांमध्ये होत्या. त्यानंतर १९२१ मध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधून डॉ. आंबेडकरांनी डॉ. ऑफ सायन्स ही अतिउच्च पदवी मिळवली ही देखील अर्थशास्त्र हा विषय घेऊनच. अर्थशास्त्राचे उच्च शिक्षण घेत असताना त्यांनी अर्थशास्त्रावर मौलिक ग्रंथ लिहिले. मायदेशी परतल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी अर्थशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ लिहिले नसले तरी इतर विषयांमध्ये त्यांनी जी महत्वपूर्ण ग्रंथ निर्मिती केली त्या बहुतेक सर्व ग्रंथांना अर्थशास्त्राचे परिमाण असल्याचे दिसून येते. त्यामध्ये जातीव्यवस्था व अस्पृश्यता यासारख्या सामाजिक समस्यांच्या आर्थिक परिमाणाची त्यांनी केलेली अभ्यासपूर्ण मिमांसा यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

**प्रस्तावना:**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, कायदेतज्ञ, अशा अनेक पैलूंची जनतेला ओळख आहे. परंतु त्यांचा अर्थविषयक पैलू काहीसा दुर्लक्षित राहिल्यासारखा वाटतो. त्यांचे आर्थिक विचार समजून घेताना हे लक्षात येते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांच्या या विचारांची ओळख जनतेला व्हावी या हेतूने ही मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपण घटनातज्ञ, कायद्याचे गाढे अभ्यासक, संसदपटू, राजकारणी अशा विविध रूपात ओळखतो पण एक अर्थतज्ञ म्हणून त्यांची ओळख फार दुर्मिळ अशी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समृद्ध आणि विविधांगी व्यक्तिमत्वाचा एक पैलू म्हणजे ते जागतिक कीर्तीचे व्यासंगी अर्थतज्ञ होते. बाबासाहेबांनी उच्च शिक्षणातील ज्या अनेक पदव्या मिळवल्या त्यातल्या बहुतांशी पदव्या या भारतीय अर्थकारण, भारतीय चलन आणि विदेश व्यापाराशी संबंधित आहेत. या शिक्षणक्रमात त्यांनी सादर केलेले अनेक शोधनिबंध हे इंग्रज भारताची करत असलेली आर्थिक लुट आणि भविष्यातील भारताच्या आर्थिक विकासाची दिशा स्पष्ट करणारे आहेत. त्यांचे आर्थिक विचारांचे योगदान आपल्याला त्यांच्या एम.ए., पी.एच.डी., एम.एस.सी. या शैक्षणिक कारकिर्दीत केलेल्या लिखानातून दिसून येते व खात्री पटते कि ते एक जागतिक कीर्तीचे अर्थतज्ञ होते. नंतरच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःला मानव मुक्तीच्या लढ्यात झोकून दिल्यामुळे त्यांचे सामाजिक, राजकीय आणि धार्मिक विचार जितके समाजाला समजले त्याप्रमाणे आर्थिक विचार समजले नाहीत.

**उद्दिष्टे:**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार जाणून घेणे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचे आजच्या काळातील महत्व जाणून घेणे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा त्या त्या कालावधीत विचार होऊन त्या आधारावर आर्थिक नियोजनाची अंमलबजावणी झाली असती तर आज भारताचा वेगळा नकाशा जगाला पाहायला मिळाला असता म्हणून त्यांचे काही आर्थिक विचार जाणून घेण्याचा हा छोटासा प्रयत्न.